# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.

जा.क्र.न.आ./मुले–६/अंदाज –२२६
मा. आयुक्त यांचे कार्यालय
सोलापूर दि. १२/०२/२०१५

मा. अध्यक्ष
स्थायी समिती,
सोलापूर महानगरपालिका,
सोलापूर.

**विषय - सन २०१४-२०१५ चे सुधारित व सन २०१५-२०१६ चे अंदाजपत्रक " अ " व " क "**

सोलापूर महानगरपालिकेच्या आयुक्त या पदाची सुत्रे हाती घेतल्यानंतर माझ्या कार्यकाळातील हे दुसरे अंदाजपत्रक आहे. सन २०१४–१५ चे सुधारित व सन २०१५–१६ चे अंदाज पत्रक ''अ'' व ''क'' सादर करीत आहे.

सदर अंदाजपत्रक सादर करताना महानगरपालिकेची आर्थिक बाजू भक्कम नसल्याने आर्थिक स्वावलंबन कसे करता येईल त्यादृष्टीने, तसेच महानगरपालिकेच्या मोठ्या प्रमाणावर असलेल्या देय रक्कमा कशा भागविता येतील याबाबत व शहरातील व हद्दवाढी सह असलेल्या नागरिकांना जास्तीत जास्त नागरी सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न या अंदाजपत्रकात केलेला आहे. सोलापूर महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या बाबी अत्यंत मर्यादित स्वरुपाच्या असून, महानगरपालिकेवर असलेली कर्तव्ये पार पाडण्याची जबाबदारी असल्याने मर्यादीत उत्पन्नात काटकसर करुन सदरचे अंदाजपत्रक सादर केलेले आहे.

सन २०१४ - २०१५ चे अंदाजपत्रकांत खालीलप्रमाणे उत्पन्न अपेक्षित धरलेले होते.

## महसूली विभाग

| अ. क्र. | बाब | मान्य अंदाज |
|---|---|---|
| १ | महसूली उत्पन्न | ३९४,०८,७२,०००/- |
| २ | पाणी पुरवठा | ५५,२२,००,०००/- |
| | **एकूण** | **४४९,३०,७२,०००/-** |

(तुटीची भरपाई रक्कम रु. ७,४६,०८,०००/- वगळून)

### <u>सुधारित अंदाज</u>

| अ. क्र. | बाब | सुधारित अंदाज |
|---|---|---|
| १ | महसूली उत्पन्न | ३२२,७७,७५,०००/- |
| २ | पाणी पुरवठा | ४४,१७,००,०००/- |
| | **एकूण** | **३६६,९४,७५,०००/-** |

(तुटीची भरपाई रक्कम रु. ५,२७,०८,०००/- वगळून)

इष्टांकापेक्षा कमी/अधिक ज्या विभागाकडून आली त्याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे

| अ. क्र. | विवरण | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १ | कर आकारणी | १८,५०,००,००० | |
| २ | ग.व.सू. वसुली | ५०,००,००० | |
| ३ | उद्यान | | १६,७२,००० |
| ४ | आयातकर | ४५,०२,१०,००० | |
| ५ | मंडई | १,०८,००,००० | |
| ६ | सार्वजनिक आरोग्य अभियंता | २,१०,५०,००० | |
| ७ | नगर अभियंता | १,४९,००,००० | |
| ८ | भूमी व मालमत्ता | १,०५,५०,००० | |
| ९ | सामान्य प्रशासन विभाग | १५,००,००० | |
| १० | हद्दवाढ | ५,५५,००,००० | |
| ११ | आरोग्य खाते | १२,५५,००० | |
| १२ | इतर बाबी | ६,९५,०४,००० | |
| | **एकूण** | ८२,५२,६९,००० | १६,७२,००० |

| | | | |
|---|---|---|---|
| कमी | – | रु. | ८२,५२,६९,०००/- |
| अधिक | – | रु. | १६,७२,०००/- |
| **एकूण** | – | **रु.** | **८२,३५,९७,०००/-** |

सन २०१४–२०१५ चे सुधारित अंदाजपत्रकामध्ये दिलेल्या उद्दीष्टाप्रमाणे महसूली उत्पन्न आले नाही त्याची कारणे पुढीलप्रमाणें

**स्थानिक संस्था कर (एस्कॉर्टसह)**

सन २०१४–१५ या आर्थिक सालाकरिता स्थानिक संस्था कर (एस्कॉर्टसह) या शिर्षाखाली र.रु. १८०,००,००,०००/– इतका इष्टांक देणेत आला आहे. सन २०१३–२०१४ च्या प्रथम सहांमाही मध्ये मिळालेले एकूण प्रत्यक्ष उत्पन्न रक्कम रु. ३४,४०,८२,०३१/– इतके मिळालेले आहे. व चालू आर्थिक वर्ष सन २०१४–२०१५ च्या प्रथम सहामाहीमध्ये रक्कम रु.५१,८२,६७,६७१/– इतके प्रत्यक्ष उत्पन्न प्राप्त झाले आहे. सन २०१४–२०१५ मधील प्रथम सहामाहीचे उत्पन्न गतवर्षाचे प्रथम सहामाही उत्पन्नापेक्षा र.रु. १४,४१,८५,६४०/– ने जास्त आहे.

मा. महाराष्ट्र शासनाचे दि. १ फेब्रुवारी २०११ च्या अधिसूचनेनुसार सोलापूर शहराच्या हद्दीमध्ये उपभोग, उपयोग किंवा विक्री यासाठी आयात होणाऱ्या मालाच्या प्रवेशावर जकातीऐवजी स्थानिक संस्था कर दि.१/४/२०११ पासून लागू करणेत आला आहे. त्यानुसार या शीर्षाखाली उत्पन्न अपेक्षित धरलेले आहे. स्थानिक संस्था करास व्यापारी संघटनांचा असणारा तीव्र विरोध काही अंशी कमी झाला असून, काही व्यापाऱ्यांकडून स्थानिक संस्था करास थोडाफार प्रमाणात प्रतिसाद मिळू लागलेला आहे. परिणामी सोलापूर महानगरपालिकेस गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी चांगले उत्पन्न स्थानिक संस्था करापासून मिळू लागले होते. स्थानिक संस्था कर वसुलीसाठी कडक मोहिम राबविणेत येत आहे. तथापि वृत्त वाहिन्या व वृत्तपत्रे या मधून स्थानिक संस्था कर सत्वर रद्द करणेत येईल असे शासनस्तरावर वृत प्रसारीत केले जात असलने याचा परिणाम व्यापाऱ्यांना मानसिकतेवर होऊन कर भरण्यात टाळाटाळ करीत आहेत. अशीच परिस्थिती अन्य महानगरपालिकेत दिसून येत आहे.

सबब चालु आर्थिक वर्षात प्रथम सहामाही मध्ये प्रत्यक्ष मिळालेले उत्पन्न हे माहे डिसेंबर २०१४ अखेर प्रत्यक्ष मिळालेले उत्पन्न रक्कम रु. ८०,९३,१५,६९९/– विचारात घेता माहे मार्च २०१५ अखेर सन २०१४–

२०१५ करिता दिलेल्या इष्टांकाप्रमाणे वसुली आणणेकामी कसोशिने प्रयत्न केले जात असून व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली वसूली मोहिम हाती घेण्यात आलेले आहे. तसेच सध्या व्यापाऱ्यांच्या कर निर्धारणाचे काम हाती असल्याने माहे जानेवारी २०१५ अखेर व्यापाऱ्यांकडून येणे रक्कम निर्धारित होऊन त्याची वसुली प्रत्यक्षात सुरु केले जाईल. याचा विचार स्थानिक संस्था कर या शीर्षखाली एकून र.रु. १५०,००,००,०००/- उत्पन्न सुचविण्यात आलेले आहे.

**पारगमन शुल्क (एस्कॉर्ट फी)** : सन २०१४-२०१५ या आर्थिक सालाकरिता पारगमन शुल्क (एस्कॉर्ट फी) या शिर्षाखाली र.रु. ३५.०० कोटी इतका इष्टांक देणेत आला आहे. सन २०१३-२०१४ च्या प्रथम सहामाही मध्ये मिळालेले एकूण प्रत्यक्ष उत्पन्न रक्कम रु. १२,९१,३०,५९२/- इतके मिळालेले आहे. व चालु आर्थिक वर्ष सन २०१४-२०१५ च्या प्रथम सहामहीमध्ये रक्कम रु. १२,७९,४०,८२०/- इतके प्रत्यक्ष उत्पन्न प्राप्त झाले आहे. सन २०१४-२०१५ मधील प्रथम सहामाहीचे उत्पन्न गतवर्षाचे प्रथम सहामाही उत्पन्नापेक्षा र.रु. ११,८९,७७२/- ने कमी आहे. त्याचे प्रमुख कारण शहरात होणाऱ्या वाढत्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर मा. जिल्हाधिकारी यांनी दिवसा शहरात येणाऱ्या जड वाहतुकीवर बंदी घातलेली आहे. त्यामुळे मंद्रुप-मोहोळ बाह्यवळण महामार्गाचा वापर वाढलेल असून, त्याचा परिणामदेखील एस्कॉर्ट उत्पन्नावर झालेला आहे. मोटार वाहन संघटनेने राज्यातील महानगरपालिका क्षेत्रातील चालु असलेले पारगमन शुल्क (एस्कॉर्ट फी) बंद करणेबाबत मा.शासन स्तरावर प्रयत्न करुन दि. १५/८/२०१४ पासून सोलापूर व मालेगांव महानगरपालिका वगळता अन्य महानगरपालिका मध्ये चालू असलेले पारगमन शुल्क (एस्कॉर्ट फी) वसूली बंद करणेबाबत मा.महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडून आदेश देण्यात आलेले आहेत. तथापि सोलापूर महानगरपालिका अद्याप पारगमन शुल्क वसुली सुरु ठेवली असल्याची बाब काही वाहतुक संघटनांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिलेली आहे त्यामुळे मा.उपसचिव, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि. २८/१/२०१५ ने पत्र पाठवून दि. ३० जानेवारी २०१५ च्या मध्यरात्री पासून एस्कॉर्ट फी ची वसुली बंद करणेबाबत आदेश दिलेले आहेत. त्यामुळे दि. ३० जानेवारी २०१५ अखेर एस्कॉर्ट फी वसुली बंद करण्यात आलेली आहे. त्यामुळे दि. ३० जानेवारी २०१५ अखेर एस्कॉर्ट फी पासून एकुण र.रु.

२७.०० कोटी इतके उत्पन्न प्राप्त झालेले आहेत.

अशा प्रकारे स्थानिक संस्था कर (एस्कॉर्टसह) या शीर्षाखाली एकूण र.रु. १७७,००,००,०००/- उत्पन्न प्राप्त होऊ शकेल.

## कर आकारणी व कर संकलन

सन २०१४-२०१५ चे उद्दीष्ट देताना मागील थकबाकीच्या ७०% व चालू जमाबंदी पोटी ८०% वसूली अपेक्षित धरण्यात आलेली होती. याशिवाय कर आकारणी खात्याकडील काही मिळकतीही झोपडपट्टी विभागात येतात. त्यांच्याही नोंदी या विभागात येत असल्याने जमाबंदीमध्ये बदल करावा लागणार आहे. एकूण जमाबंदी पैकी काही रक्कम पाण्याची असुन, शहरातील मोठमोठ्या गिरण्या तसेच लक्ष्मी-विष्णू, जाम मिल, नरसिंग गिरजी मिल, विव्हको प्रोसेस वगैरे बंद झाल्याने त्याचाही उत्पन्नावर परिणाम झालेला आहे. शहरातील ज्या मिळकतदाराकडे थकबाकी आहे, अशा मिळकती जप्त करुन थकबाकी वसुलीची कार्यवाही सुरु केलेली आहे. याशिवाय थकबाकी धारकांचे नळ बंद करणे, जंगम मालमत्ता जप्त करणे वगैरे कारवाई सुरु केलेली आहे.

शहरातील ज्या मिळकतदाराकडे थकबाकी आहे अशा थकबाकी धारकाकडून थकबाकी वसुलीसाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न करणेत येत असून त्या सर्वबाबींचा विचार करुनही वर्ष अखेरीस र.रु.८०.७१ कोटी एवढेच उत्पन्न अपेक्षित आहे.

## हद्दवाढ विभाग

हद्दवाढ विभागामध्ये ज्या मिळकती आहेत त्यातील बऱ्याच ठिकाणी पूर्वी लोक रहात नव्हते. परंतू यामध्ये हळूहळू सुधारणा होत असून, महानगरपालिकेस मिळणाऱ्या उत्पन्नाचा विचार करुन हद्दवाढ भागामध्ये म्हणावे तेवढे रस्ते, ड्रेनेज, गटारी, दिवाबत्ती, पाणीपुरवठा वगैरे बाबतीत अद्यापी पुरेशा सुधारणा होत नसल्याने तसेच एम.आय.डी.सी. भागातील कारखाने ५०% बंद असल्याने व पाण्याची पाईपलाईन सर्व हद्दवाढ भागात नसल्याने मिळकत दारांचा खाजगी नळ घेणे बाबतचा कल दिसून येत नाही. पाण्याची पाईपलाईन हद्दवाढ भागात सुरळीत झाल्यास मिळकतदार खाजगी नळ घेतल्यास सार्वजनिक पाणी पट्टी कमी होऊन खाजगी नळ आकारणी उत्पन्नात वाढ होईल व चालू आर्थिक वर्षात अपेक्षित उत्पन्न र.रु.४३.४५/- कोटी उत्पन्न अपेक्षित आहे.

## नगर अभियंता

या खात्याकडून जे उत्पन्न अपेक्षित आहे त्यामध्ये हद्दवाढ भागातील बांधकाम परवाना फी, बांधकाम परवाना विकास शुल्क व हद्दवाढ भागातील डेव्हलपमेंट चार्जेस इ. चा समावेश होतो. हद्दवाढ भागातील जी बांधकामे नियमित करुन घ्यावयाची आहेत. त्यातील काही भागांचा ले आऊट मंजूर नसल्याने अपेक्षित उत्पन्न आलेले नाही. हद्दवाढ भागाची मोजणी (Land Survey and Measurement) न झाल्याने एकूण प्रॉपर्टीज मोजमापात येऊ शकल्या नाहीत. त्याच बरोबर गुंठेवारी ने मिळणारी रक्कम उपलब्ध होऊ शकली नाही.

## गलिच्छ वस्ती विभाग

गलिच्छ वस्ती विभागासाठी सन २०१४-१५ करिता उद्दिष्ट देण्यात आले होते त्याप्रमाणे वसुल होईल असे वाटत नाही. कारण गलिच्छ वस्ती विभागाकडे प्रामुख्याने झोपडपट्टीचा समावेश होत असल्याने जास्तीत जास्त झोपडपट्टी सेवा आकाराच्या दराने वसुल सुरु आहे. तसेच काही मिळकतीवर दुहेरी आकारणीही झालेली आहे. गलिच्छ वस्तीमधील नागरिक दुर्बल घटकातील असल्याने वसुलीसाठी सक्तीचा व कडक उपाययोजना करणे अडचणीचे होत आहे. झोपडपट्टी धारकांना नवीन ओळखपत्र देण्याची कार्यवाही सुरु करणेत आली असून, प्रत्येक झोपडपट्टीधारकांचे पूर्वीची थकबाकी भरल्याशिवाय नवीन ओळखपत्रे देण्यात येऊ नये, अशी सक्त सुचना देण्यात आल्याने मार्च २०१५ अखेर रक्कम रु.४.५० कोटी इतके उत्पन्न अपेक्षित धरण्यात आलेले आहे.

## भुमी व मालमत्ता

या विभागाच्या अधिपत्याखाली महानगरपालिकेने बांधलेली सर्व व्यापारी संकुले व मिनी गाळे येतात. याशिवाय अनाधिकृत खोक्यांचे भाडेवसुली याच विभागाकडून केली जाते. सन २०१४-१५ मध्ये जे उद्दिष्ट देण्यात आलेले होते. त्याप्रमाणे थकबाकीदारांच्या बाबतीत नोटीसा काढून गाळे जप्ती सारख्या प्रकाराचा अवलंब करुन थकबाकी वसुलीची धडक मोहिम हाती घेण्यात आलेली आहे. जे गाळे रिकामे आहेत, त्याला विशेष मागणी नसली तरी जाहीर प्रसिध्दीकरणाच्या आधारे सर्वच गाळे भाडेपट्टी कराराने दिले जातील. यासाठीही प्रयत्न केले जात आहेत.

याबाबत सातत्याने पाठपुरावा करुनही मार्च २०१५ अखेर रक्कम रु. ४.४४ कोटी इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

वरील प्रमाणे सन २०१४-२०१५ चे सुधारीत अंदाजपत्रकात

## सन २०१५–१६ चे अंदाजपत्रक

| **जमा रक्कम रूपये** | **तपशील** | **खर्च रक्कम रूपये** |
|---|---|---|
| | महसूल विभाग | |
| २,५७,४०१ | आरंभीची शिल्लक | |
| ३७५,४३,९४,००० | महसूली विभाग | ३३६,७०,००,००० |
| ६२,१९,६९,००० | पाणीपुरवठा | ६२,१९,६९,००० |
| | महसूल निधीतून भांडवली कामासाठी वर्ग | ३८,७३,९४,००० |
| | अखेरची शिल्लक | २,५७,४०१ |
| **४३७,६६,२०,४०१** | **एकूण** | **४३७,६६,२०,४०१** |

| | | |
|---|---|---|
| | **भांडवली विभाग** | |
| ६२,४३,९४,००० | महसुली निधीतून भांडवली कामे | ६२,४३,९४,००० |
| ३४५,९३,२२,००० | अनुदानातून करावयाची कामे | ३४५,९३,२२,००० |
| १७०,००,००,००० | कर्ज विभाग | १७०,००,००,००० |
| १५,००,००,००० | विशेष अनुदान | १५,००,००,००० |
| १०,००,००० | शासकीय अनुदान | १०,००,००० |
| ८,००,००,००० | विकास कामाचे अनुदान | ८,००,००,००० |
| **६०१,४७,१६,०००** | **एकूण** | **६०१,४७,१६,०००** |
| **१०३९,१३,३६,४०१** | **एकूण** | **१०३९,१३,३६,४०१** |

### महसूल निधीतील जमा

महानगरपालिका ज्या वेगवेगळ्या बाबीवर खर्च करते तो खर्च महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नातून भागविला जातो. उत्पन्नाच्या प्रमुख बाबी म्हणजे स्थानिक संस्था कर/आयातकर, करआकारणी, भूमी व मालमत्ता, नगरअभियंता व सार्वजनिक आरोग्य अभियंता इत्यादि आहेत. उत्पन्नाच्या मानाने वेगवेगळ्या बाबीवर होणारे खर्चाचे प्रमाण वाढलेले आहे , काटकसरीचे धोरण अवलंबावे लागणार आहे.

म.न.पा.च्या कर्मचाऱ्यांच्या वेगवेगळ्या देय रक्कमा, प्रत्येक वस्तुच्या

किंमतीमध्ये झालेली वाढ, विजेची बिले, छपाई, स्टेशनरी, रासायनिक पदार्थ तसेच सुटे भाग या मधील खर्चामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे.

## <u>स्थानिक संस्था कर (एस्कॉर्टसह) :</u>

सन २०१४–१५ साठी या शिर्षाखाली रु.१८०,००,००,०००/– इतके उध्दिष्ट देणेत आले आहे. या शिर्षाखाली मार्च २०१५ अखेर १५०,००,००,०००/– उत्पन्न, कठोर प्रयत्नाअंती अपेक्षित आहे.

आजू–बाजूच्या तालुका स्तरावरील शहरामध्ये जकात कर नसल्याने स्थानिक व्यापारावर अप्रत्यक्षरित्या परिणाम झालेल्या असून आवक मंदावली आहे.

मा. शासन स्तरावर स्थानिक संस्था कर रद्द करण्यात येणार असलेबाबत व वेळोवेळी प्रसार माध्यमातून बातमी प्रसारीत होत असल्याने त्याचा परिणम व्यापाऱ्यांच्या मानसिकतेवर होऊन व्यापारी स्थानिक संस्था कर भरण्यात टाळाटाळ करीत आहेत. तथापि जो पर्यंत हा कर अंमलात आहे. तो पर्यत तो वसूल करणे प्रशासनास अनिवार्य आहे. त्याप्रमाणे नियोजन करुन वसुली मोहिम राबविणेत येत आहे.

सन २०१५/२०१६ या आर्थिक वर्षासाठी स्थानिक संस्था कर या शिर्षाखालील महसुली उत्पन्न अंदाजे र.रु. २०० कोटी अपेक्षित आहे.

### पारगमन शुल्क (एस्कॉर्ट फी) :

सन २०१४–२०१५ आर्थिक सालाकरिता पारगमन शुल्क (एस्कॉर्ट फी) या शिर्षाखाली र.रु. ३५.०० कोटी इतका इष्टांक देणेत आले आहे. तथापि मा. उपसचिव, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि. २८/१/२०१५ ने पत्र पाठवून ३० जानेवारी २०१५ च्या मध्यरात्री पासून एस्कॉर्ट फी वसुली बंद करण्याबाबत आदेश झालेले असल्याने, ३० जानेवारी २०१५ पासून एस्कॉर्ट फी वसुली बंद करण्यात आलेली आहेत. त्यामुळे सन २०१५–२०१६ या आर्थिक वर्षात पारगमन शुल्क (एस्कॉर्ट फी) पासुनचे कोणतेही उत्पन्न अपेक्षित धरणेत आलेले नाही.

**<u>स्थानिक संस्था करापोटी शासन अनुदान :</u>** सन २०१४–१५ करिता या शिर्षाखाली र. रु.२०,००,००,०००/– उद्दिष्ट देण्यात आले असता, मा. शासनाकडून माहे डिसेंबर २०१४ अखेर विशेष अनुदान म्हणून प्राप्त झालेली नाही. मात्र १% मुद्रांक शुल्क अनुदानापोटी र.रु. ६.५७ कोटी मंजूर झालेले आहेत. मा. शासनाचे अनुदानाबाबतचे सध्याचे धोरण विचारात घेता, मार्च २०१६ अखेर मा. शासनाकडून मुद्रांक शुल्क १% अधिभारातून र.रु.१०.०० कोटी अनुदान मिळणेची अपेक्षा धरणेस हरकत नाही. मिळणारे अनुदान हे सर्वस्वी मा. शासनावर अवलंबून आहे. ही बाब विचारात घेवून या सदरी गतवर्षी प्रमाणे र.रु. २०.०० कोटी इतके सुचविणेत येत आहे.

## <u>कर आकारणी व कर संकलन :</u>

G.I.S based शहरातील सर्व मालमत्ता धारकांची सर्व्हे बाबतीत निविदा काढणेत आली आहे आणि निविदेचे काम पूर्ण होण्यास एक वर्षाचा कालावधी लागणार आहे. ज्या मालमत्तांना कर नाही किंवा ज्यांनी अतिरिक्त बांधकाम केलेला आहे अशा सर्व मालमत्ता धारकांकडून दंडासह पुढील वर्षी अंदाजीत रक्कम रु. २५० कोटी पेक्षा अधिक रक्कम प्राप्त होऊ शकते.

मागील ३ वर्षाचा उत्पन्नाचा व नैसर्गिक बाबीचा विचार करुन थकबाकीचा ६०% व जमाबंदीचा ८०% उत्पन्न धरुन पुढील वर्षासाठी कर आकारणी व कर संकलन खात्याकडून रक्कम रु.९३.८१ कोटी इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

शहरामध्ये असलेल्या मिळकतीचे आकारणीचे बिले, ग.व.सु. विभागाकडून तसेच कर आकारणी खात्याकडून या दोन्ही विभागाकडून एकाच मिळकतीचे दोन वेळा आकारणी होत असल्याने अशा न प्राप्त होणाऱ्या रक्कमा डिमांडमध्ये दर्शविल्या जात आहेत.

खुल्या जागेवर किंवा जुनी इमारत पाडून त्या ठिकाणी नवीन इमारती झाल्या आहेत. अशाबाबतीत जुन्या इमारतीवरील आकारण्या कमी न होता त्या मिळकतीवरच नवीन बांधकामाच्या आकारण्या होऊन या दोन्ही आकारण्या डिमांडमध्ये आहेत.

भाडेकरी अगर बिल्डरनी घेतलेले नळ भाडेकरी अगर बिल्डर हे नळ बंद करुन न घेता ते जागा सोडून जातात. त्यामुळे अशा रक्कमा डिमांडमध्ये तशाच वर्षानुवर्षे पुढे ओढल्याने वर्षानुवर्षे डिमांड वाढत चाललेले आहे. त्याचप्रमाणे शहरातील बंद पडलेले मोठे उद्योग, उदा.लक्ष्मी–विष्णू मिल , सोलापूर सूत गिरणी, यशवंत सूत गिरणी, विव्हको प्रोसेस यांचेकडील म्यु. पल कर व पाणी बिलाची थकबाकी ही न वसूल होणारी रक्कम असून, त्यांचा देखील डिमांड मध्ये समावेश आहे.

सरकारी कार्यालयाकडे असलेले इमारतीवरील अगर पाण्याच्या बिलावरील दंडाची रक्कम सरकारी कार्यालये भरत नसल्याने अशा रक्कमा मार्च २०१४ अखेर सुमारे र. रु.१५.४५ कोटी इतकी होत आहे.

## भूमी व मालमत्ता कार्यालय :

सोलापूर शहरातील महानगरपालिकेच्या मालकीची निरनिराळे भूखंड, इमारती, व जागा निरनिराळ्या व्यक्ती व संस्थांना भुई भाड्याने अथवा भाड्याने देण्यात आलेल्या आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (ड) नुसार चालू बाजार भावाने भाड्याने अथवा विक्री करणे कायद्याने बंधनकारक असल्याने या पूर्वी अश्या ज्या जागा अथवा इमारती नाममात्र दराने भाड्याने दिलेले आहेत. अश्या जागांचे पुर्ननिरीक्षण करुन सध्याचे होणारे बाजार भावाने त्यांचेकडून भाडे वसूल करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

## महसुली खर्च :

सन २०१५–१६ चे अंदाजपत्रक तयार करताना दुरुस्ती देखभालीच्या खर्चा बरोबरच सेवकांच्या वेतनावर सध्या दाखविणेत आलेल्या खर्चा व्यतिरिक्त सेवकांच्या देय रक्कमाचा विचार करणे क्रमप्राप्त आहे. म.न.पा. सेवक, सेवानिवृत्त सेवकांचे पेन्शन, प्राथमिक व दुय्यम शिक्षण सेवकांचे खर्च व पाणीपुरवठा सेवकवर्ग खर्च याचा विचार करता एकूण अपेक्षित उत्पन्नाच्या ३५.४८% इतका आस्थापना खर्च होणार आहे.

तसेच मा.महाराष्ट्र शासनाने राज्यशासकीय कर्मचाऱ्यांना ६ वे वेतन आयोगानुसार दि.१/१/२००६ पासून वेतन निश्चिती करुन माहे एप्रिल २००९ पेडइन मे ०९ या महिन्यापासून वेतन देण्याचे जाहिर केले आहे व दिनांक १/१/२००६ पूर्वीच्या निवृत्ती वेतन धारकांच्या वेतनात वाढ होणार आहे. आजला या बाबत म.न.पा. ने माहे फेब्रुवारी २०११ पेडइन मार्च २०११ पासून ६ वे वेतन आयोग लागू केलेले आहे.

**मा. महाराष्ट्र शासनाचे निर्देशानुसार महिला व बालकल्याण समितीसाठी व आंबेडकर आवास योजना (श्रमसाफल्य) एकूण महसूलीमधील शिल्लक रकमेतून ५% इतकी रक्कम तसेच अपंगासाठी ३ टक्के इतकी रक्कम तरतूद सुचविणेत आलेली आहे.**

## सन २०१५-२०१६ च्या आर्थिक वर्षामध्ये विविध बाबीपासून मिळणारे उत्पन्न व त्याची टक्केवारी पुढीलप्रमाणे

### महसूली जमा

| अ.क्र. | विवरण | २०१५-१६ | |
|---|---|---|---|
| | | अंदाज र. रू. | शेकडा प्रमाण |
| १ | आयातकर/स्थानिक संस्था कर | २००,००,००,००० | ४५.७० |
| २ | पाणी पुरवठा | ६२,१९,६९,००० | १४.२१ |
| ३ | म.न.पा. कर | १००,३५,००,००० | २२.९३ |
| ४ | म.न.पा. जागा भाडे | ६,०६,७५,००० | १.३९ |
| ५ | शासकीय अनुदान | २६,८९,४१,००० | ६.१५ |
| ६ | इतर जमा | १४,४९,१८,००० | ३.३१ |
| ७ | म.न.पा. दरापासून उत्पन्न | १९,१३,६०,००० | ४.३७ |
| ८ | विकास शुल्क | ७,००,००,००० | १.६० |
| ९ | गुंठेवारी क्षेत्रात मूलभूत सोई करणे | १,५०,००,००० | ०.३४ |
| | **एकूण** | **४३७,६३,६३,०००** | **१००.००** |

### महसूली खर्च

| अ.क्र. | विवरण | अंदाज र. रू. | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | कायम सेवक वर्ग खर्च (पाणी पुरवठा व्यतिरिक्त ) | १५५,२५,४८,००० | ३५.४८ |
| २ | कर्जावरील खर्च | ३,३१,७५,००० | ०.७६ |
| ३ | प्राथमिक व दुय्यम शिक्षणावरील खर्च | १६,४६,८५,००० | ३.७६ |
| ४ | पाणी पुरवठा | ६२,१९,६९,००० | १४.२१ |
| ५ | सेवानिवृत्ती वेतन व तोषदान | ४२,१६,००,००० | ९.६३ |
| ६ | आरोग्य | १७,८१,७५,००० | ४.०७ |
| ७ | निगा व दुरूस्ती | १३,१२,९२,००० | ३.०० |
| ८ | दिवाबत्ती व अग्निशामक | ११,२४,००,००० | २.५७ |
| ९ | विकास शुल्क | ७,००,००,००० | १.६० |
| १० | गुंठेवारी क्षेत्रात मूलभूत सोयी करणे | १,५०,००,००० | ०.३४ |
| ११ | आवश्यक बाबीवरील नैमित्तीक खर्च | ४६,७६,१६,००० | १०.६९ |
| १२ | संकीर्ण | १,४२,४०,००० | ०.३३ |
| १३ | महसूल निधीतून भांडवली कामासाठी वर्ग | ३८,७३,९४,००० | ८.८५ |
| १४ | पाणीपुरवठा तुटीपोटी वर्ग | १५,६२,६९,००० | ३.५७ |
| १५ | परिवहन आर्थिक सहाय्य | ५,००,००,००० | १.१४ |
| | **एकूण** | **४३७,६३,६३,०००** | **१००.०००** |

# भांडवली विभाग जमाबाजू

भांडवली विभागाकडील अंदाज पत्रकीय जमा खालीलप्रमाणे अपेक्षित आहे.

## 'अ' महसूल निधीतून करावयाची कामे

| अ. क्र. | विवरण | र. रूपये |
|---|---|---|
| १ | महसूली निधीतून भांडवली कामासाठी | ३८,७३,९४,००० |
| २ | विकास शुल्क महसूल निधीतून वर्ग | ७,००,००,००० |
| ३ | गुंठेवारी क्षेत्रात मूलभूत सोई करणे | १,५०,००,००० |
| ४ | बी. ओ. टी. योजना | १०,००,००,००० |
| ५ | हद्दवाढ भागात मोजणी करणे | २०,००,००० |
| ६ | आयएचएसडीपी योजना बी.ओ.टी.वर राबविणे (राहुल नगर) | ५,००,००,००० |
| | **एकूण** | **६२,४३,९४,०००** |

## 'ब' अनुदानातून करावयाची कामे

| अ. क्र. | विवरण | र. रूपये |
|---|---|---|
| १ | एकात्मिककृत गृहनिर्माण व विकास कार्यक्रम अनुदान/ राजीव आवास योजना | २,००,००,००० |
| २ | राजीव आवास योजना<br>शासन अनुदान | १०५,९५,००,००० |
| ३ | नवीन रस्ते व दुरुस्तीसाठी शासकिय अनुदान | ५,००,००,००० |
| ४ | T.C.I.D.S. अनुदान | १,००,००,००० |
| ५ | आधुनिक मत्स बाजापेठ उभारणे | १,५७,००,००० |
| ६ | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सार्व. पुरातन वास्तुच्या संवर्धनासाठी सहाय्यक अनुदान | १,००,००,००० |
| ७ | नागरी दलित्तेर योनजेअंतर्गत वस्त्यांमध्ये सुधारणा<br>अ) प्रकल्प अधिकारी, नगरपालिका विभाग अनुदान | २,८५,००,००० |
| ८ | जिल्हा नियोजन समिती स्थानिक विकास निधी<br>अ) खासदार निधी – ५०,००,०००<br>ब) आमदार निधी – १,३०,००,००० | १,८०,००,००० |
| ९ | तेरावे वित्त आयोग अनुदान | १०,००,००,००० |
| १० | तातडीने पाणी पुरवठा अनुदान | २२,२२,००० |
| ११ | महाराष्ट्र नगरोत्थान महाअभियान (रस्ते, गटारे, पाणीपुरवठा, भूसंपादन) जिल्हास्तर<br>जिल्हा नियोजन समिती हिस्सा | ३०,००,००,००० |
| १२ | महात्मा गांधी प्राणी संग्राहलय अनुदान | २,००,००,००० |
| १३ | अल्पसंख्यांक विकास अनुदान | २०,००,००० |

| अ. क्र. | विवरण | र. रूपये |
|---|---|---|
| १४ | महाराष्ट्र शासन सुवर्ण जयंती नागरी पुर्न:उत्थान योजना अनुदान रस्ते व मलनित्सारण व्यवस्था (राज्य शासन) | १६८,८४,००,००० |
| १५ | रमाई आवास योजना | १०,००,००,००० |
| १६ | विकास योजना राबविणेसाठी महानगरपालिकांना सहाय्यक अनुदान<br>सहा. संचालक नगररचना यांचेकडून अनुदान | १,००,००,००० |
| १७ | अग्निशमन सेवा बळकटीकरण करणे | ५०,००,००० |
| १८ | चॅलेंज फंड | २,००,००,००० |
| | **एकूण** | **३४५,९३,२२,०००** |

## ‘क’

| अ. क्र. | कर्जे | र. रूपये |
|---|---|---|
| | बँक कर्जे | |
| १ | सुवर्णजयंती नगरोत्थान अंतर्गत सोलापूर शहर ड्रेनेज व रस्ते व्यवस्था सुधारणे करिता ३०% मनपा हिस्सा सदरी सॉफ्ट लोन करणे | ११३,००,००,००० |
| २ | परिवहन विभागासाठी नवीन बसेच खरेदी | ५७,००,००,००० |
| | **एकूण** | **१७०,००,००,०००** |

## ‘ड’

| | | |
|---|---|---|
| | म.न.पा.क्षेत्रात प्राथमिक सोयी-सुविधांसाठी विशेष अनुदान | **१५,००,००,०००** |

## ‘इ’

| अ. क्र. | विकास कामाचे अनुदान | र. रूपये |
|---|---|---|
| १ | शहर विकास आराखड्यातील विकास कामाकरिता | **१०,००,०००** |

## ‘ ई ’

| अ. क्र. | शासकीय अनुदान | र. रूपये |
|---|---|---|
| १ | दलित वस्त्यांच्या विकास कामासाठी राज्य शासनाकडून अनुदान | **८,००,००,०००** |

| | | |
|---|---|---|
| | **अ ते ई ची बेरीज** | **६०१,४७,१६,०००** |

# भांडवली विभाग खर्चबाजू

## 'अ' महसुल निधीतून करावयाची कामे

| अ. क्र. | विवरण | र. रूपये |
|---|---|---|
| १ | रस्ते बांधणे | २,००,००,००० |
| २ | शहरातील भागांचे सुशोभिकरण करणे, सुधारणा करणे व नवीन बाग करणे | १,००,००,००० |
| ३ | शहरातील पुतळे परिसर सुधारणा करणे व नवीन पुतळे बसविणे | १,००,००,००० |
| ४ | MIDC भागात विविध सुधारणा करणे (TCIDS) | ५०,००,००० |
| ५ | वॉर्डवाईज कामे | ६,४२,००,००० |
| ६ | नेहरु सायन्स सेंटर देखभाल दुरुस्ती | २८,००,००० |
| ७ | ड्रेनेज लाईन घालणे व गटारी बांधणे | १,४३,९४,००० |
| ८ | पाण्याच्या टाक्या बांधणे व पाईपलाईन घालणे | ४,००,००,००० |
| ९ | हद्दवाढ भागात मोजणी करणे | २०,००,००० |
| १० | बांधा, वापरा व हस्तांतरण करा योजना | २५,००,००० |
| ११ | नागरी दलित वस्ती पाणीपुरवठा योजना | २५,००,००० |
| १२ | गुंठेवारी क्षेत्रात मुलभूत सोयी करणे | १,५०,००,००० |
| १३ | विविध योजनासाठी DPR तयार करणे | १,००,००,००० |
| १४ | आयएचएसडीपी योजना राबविणे (राहुल नगर) | ५,००,००,००० |
| १५ | NTPC पाईप उजनी लाईन, सोरेगांव एक्सप्रेस फिडर जागा संपादन इत्यादी | १,५०,००,००० |
| १६ | विविध योजनेसाठी मनपा हिस्सा | ३५,००,००,००० |
| १७ | भूसंपादन करणे | १,००,००,००० |
| १८ | योगा मंदीर बांधणे | १०,००,००० |
| | **एकूण** | **६२,४३,९४,०००** |

## 'ब' अनुदानातून करावयाची कामे

| अ. क्र. | विवरण | र. रूपये |
|---|---|---|
| १ | एकात्मिक गृहनिर्माण व विकास कार्यक्रम अनुदान/राजीव आवास योजना | २,००,००,००० |
| २ | राजीव आवास योजना<br>शासन अनुदान | १०५,९५,००,००० |
| ३ | नवीन रस्ते व दुरुस्तीसाठी शासकीय अनुदान | ५,००,००,००० |
| ४ | टी.सी.आय.डी.एस. अनुदान | १,००,००,००० |
| ५ | आधुनिक मत्स बाजारपेठ उभारणे | १,५७,००,००० |
| ६ | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सार्व. पुरातन वास्तुच्या संवर्धनासाठी सहाय्यक अनुदान | १,००,००,००० |
| ७ | नागरी दलितत्तेर योजनेअंतर्गत वस्त्यांमध्ये सुधारणा<br>अ) प्रकल्प अधिकारी नगरपालिका विभाग अनुदान | २,८५,००,००० |
| ८ | जिल्हा नियोजन समिती स्थानिक विकास निधी<br>अ) खासदार निधी – ५०,००,०००<br>ब) आमदार निधी – १,३०,००,००० | १,८०,००,००० |
| ९ | तेरावे वित्त आयोग अनुदान | १०,००,००,००० |
| १० | तातडीने पाणी पुरवठा अनुदान | २२,२२,००० |
| ११ | महाराष्ट्र नगरोत्थान महाअभियान (रस्ते, गटारे, पाणीपुरवठा, भुसंपादन ) जिल्हास्तर<br>जिल्हा नियोजन समिती हिस्सा | ३०,००,००,००० |
| १२ | महात्मा गांधी प्राणी संग्राहलय अनुदान | २,००,००,००० |
| १३ | अल्पसंख्यांक विकास अनुदान | २०,००,००० |
| १४ | महाराष्ट्र शासन सुवर्ण जयंती नागरी पुर्न:उत्थान योजना अनुदान रस्ते व मलनित्सारण व्यवस्था (राज्य शासन) | १६८,८४,००,००० |
| १५ | रमाई आवास योजना | १०,००,००,००० |
| १६ | विकास योजना राबविणेसाठी महानगरपालिकांना सहाय्यक अनुदान<br>सहा. संचालक नगररचना यांचे कडून अनुदान | १,००,००,००० |
| १७ | अग्निशमन सेवा बळकीटकरण करणे | ५०,००,००० |
| १८ | चॅलेंज फंड | २,००,००,००० |
| | **एकूण** | **३४५,९३,२२,०००** |

## 'क' कर्ज विभाग

| अ. क्र. | कर्जे | र. रूपये |
|---|---|---|
| | बँक कर्जे | |
| १ | सुवर्णजयंती नगरोत्थान अंतर्गत सोलापूर शहर ड्रेनेज व रस्ते व्यवस्था सुधारणे करिता ३०% मनपा हिस्सा सदरी सॉफ्ट लोन करणे | ११३,००,००,००० |
| २ | परिवहन विभागासाठी नवीन बसेस खरेदी | ५७,००,००,००० |
| | **एकूण** | **१७०,००,००,०००** |

'ड'

| | | |
|---|---|---|
| १ | म.न.पा. क्षेत्रात प्राथमिक सोयी-सुविधांसाठी विशेष अनुदान | १५,००,००,००० |

'इ'

| अ.नं. | विकास कामाचे अनुदान | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | शहर विकास आराखड्यातील विकास कामाकरिता | १०,००,००० |

'ई'

| अ.नं. | शासकीय अनुदान | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | दलित वस्त्यांमधील विकास कामासाठी राज्य शासनाकडून अनुदान | ८,००,००,००० |

| | | |
|---|---|---|
| | **अ ते ई ची बेरीज** | ६०१,४७,१६,००० |

## भांडवली निधी व अनुदानातून करावयाची कामे

१) चालू आर्थिक वर्षामध्ये महसूली निधीतून भांडवली कामासाठी र.रू. ३८,७३,९४,०००/– इतकी रक्कम उपलब्ध झालेली आहे.

२) एकात्मिकृत गृह निर्माण विकास कार्यक्रमा अंतर्गत र.रु. २ कोटी शासकीय अनुदान मिळणार आहे.

३) नवीन रस्ते दुरूस्तीकरीता शासकीय अनुदान लोकसंख्येच्या प्रमाणात रू. ५ कोटी अनुदान मिळेल असे अपेक्षित धरले आहे.

४) जिल्हा नियोजन विकास मंडळाच्या खासदार / आमदार निधितून अनुक्रमे र.रू. ५० लाख व र. रू. १.३० कोटी अशी एकूण र. रू. १.८० कोटी मिळणार असून त्या निधितून जिल्हा नियोजन व विकास मंडळाने सुचविलेली कामे हाती घेण्यात येतील.

५) राजीव आवास योजना अंतर्गत झोपडपट्टी निर्मूलन करणेसाठी मा. शासनाकडून र.रु.१०५.९५ कोटीची अनुदान मिळणार असून, त्यासाठी महापालिका हिस्सा म्हणून र.रु.१०.६० कोटीची तरतुद सुचविणेत आलेली आहे.

## 'ब' कर्ज विभाग

१) सुवर्णजयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत सोलापूर शहर ड्रेनेज व्यवस्था सुधारणा करणे करिता ५०% मनपा हिस्सा सदरी विविध वित्तीय संस्थांकडून कर्ज उभारुन

र.रु.११३ कोटीची कामे प्रस्तावित आहेत त्यासाठी विविध वित्तीय संस्थेकडून कर्ज उपलब्ध करुन घेऊन कामे करणेची  कार्यवाही प्रस्तावीत आहेत त्यासाठी विविध संस्थेकडून कर्ज उपलब्ध करुन घेऊन कामे करणेची कार्यवाही प्रस्तावीत आहे.

२) परिवहन विभागासाठी जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेअंतर्गत बसेस खरेदी करिता अनुदान मिळालेले असून, महापालिका हिस्सा म्हणून र.रु. ५७.०० कोटी रक्कम कर्ज उभारणी करुन भरावयाची आहे.

### विकास निधीतून करावयाची कामे

महानगरपालिकेने विकास कामावर खर्च केलेल्या रकमेवर २३.३३ टक्के इतके अनुदान महाराष्ट्र शासनामार्फत प्राप्त होते. ही रक्कम या आर्थिक वर्षात रूपये १० लाख येईल असे गृहीत धरून जमा धरण्यात आली आहे.

### दलित वस्त्यांच्या विकासासाठी शासकीय अनुदान

या आर्थिक वर्षामध्ये दलित वस्ती विशेष घटक योजनेखाली दलित वस्त्यामध्ये विकासाची कामे करण्यासाठी र. रू. ८ कोटीचे आर्थिक सहाय्य मिळेल असे अपेक्षित धरण्यात आले आहे.

### खुल्या बाजारातील कर्जाची परतफेड

महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती भक्कम होण्याच्या दृष्टीने व खुल्या बाजारातील कर्जाची परतफेड करण्याच्या दृष्टीने ज्या त्या निधिची तरतूद करून ती रक्कम वर्ग करणे आवश्यक आहे. परंतु गेल्या ७ –८ वर्षापासून निधीची रक्कम वर्ग करणे शक्य झाले नाही. त्याचा परिणाम महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीवर झालेला आहे.

### झोपडपट्टी विकासासाठी राजीव आवास योजना

सोलापूर महानगरपालिकामार्फत झोपडपट्टी मुक्त शहर करण्याकरिता ''राजीव आवास योजना'' राबविण्यात येत आहे. केंद्र शासन पुरस्कृत महत्वाकांक्षी 'राजीव आवास योजना' राबविण्याचे काम सोलापूर महानगरपालिका करीत आहे. या योजनाची प्रमुख उद्दिष्टे प्रामुख्याने –

१) शहर झोपडपट्टी मुक्त करणे.

२) झोपडपट्टीमधील रहिवाशांना इतर नागरीकांसारख्या सर्व सोयी सुविधा पुरविणे.

३) येथील रहिवाशांचे दारिद्रय निर्मुलन करण्याकरिता विविध व्यावसायिक प्रशिक्षण देणे, सुशिक्षित करणे, उद्योग व्यवसाय करण्याकरिता प्रेरीत करणे, त्यांना स्वावलंबी बनविणे.

४) पुढे झोपडपट्टी निर्माण होऊ नये असे नियोजन करणे.

महानरगपालिका क्षेत्रात शहर हद्दीतील एकूण १८९.०० हेक्टर क्षेत्रावर एकूण २२० झोपडपट्ट्या वसल्या आहेत. एकूण २२० झोपडपट्ट्या पैकी १५९ घोषित असून ६१ अघोषित आहेत. एकूण २२० झोपडपट्ट्या पैकी २८ महानगरपालिकेच्या जागेवर ५० सरकारी जागेवर १४२ खाजगी जागावर वसल्या आहेत. शासनने ठरवून दिलेल्या निकषानुसार म्हणजे बायोमेट्रीक सर्व्हेक्षण, प्राथमिक सर्व्हेक्षण, सामाजिक व आर्थिक सर्व्हेक्षण, टोटल स्टेशन, लाभार्थी निश्चित करणे, आराखडा तयार करणे व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे असा असून, हा टप्पा २०१२-१३ मध्ये पूर्ण करण्याचा मानस आहे. यामध्ये शासनाची मंजुरी मिळाल्यानंतर सन २०१३ ते २०१७ मध्ये प्रत्यक्ष बांधकाम करण्याचे नियोजन आहे.

प्रत्येक लाभार्थीला साधारणपणे २७० स्के. फुटचे घर बांधून दिले जाईल. ज्यामध्ये छोटा हॉल, किचन, बेडरुम संडास व बाथरुम बांधून दिले जाईल. ईमारत ही बहुमजली असणार आहे. ज्यामध्ये तळमजला व्यावसायिक वाहनाकरिता पार्कींगची सोय व सद्यस्थितीत असलेल्या दुकानदारांना मर्यादीत चटई क्षेत्राची (जागा) गाळे उपलब्ध करुन देण्यात येईल. सद्याची झोपडपट्टी ही अरुंद बोळ, कुठल्याही प्रकारच्या सोयी सुविधाचा अभाव असलेली अनारोग्य व अस्वच्छ आहेत. त्याऐवजी विस्तृत रस्ते, पथदिवे व इतर सोई सुविधा इत्यादीचे नियोजन करीत आहोत तसेच तळमजल्यावर पार्किंगची व्यवस्था करण्यात येणार आहे. व इतर सोयी सुविधा देण्याकरिता जागा उपलब्ध करुन घेण्याकरिता बांधकाम बहुमजली स्वरुपाचे नियोजन केले आहे. घरांचे वितरण लॉटरी पध्दतीने होईल.

सदरची योजना सन २०१३ ते २०१७ ह्या पाच वर्षात टप्प्या-टप्प्याने पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यामध्ये प्राधान्याने घोषित झोपडपट्ट्या पहिल्यांदा व त्यांना अघोषित झोपडपट्ट्यांचे नियोजन केले आहे. योजना टप्प्या-टप्प्याने राबविण्यात

येणार असून त्या वेळच्या बांधकाम किंमतीच्या १० ते १२% प्रत्यक्ष लाभार्त्यांकडून घेण्यात येईल. केंद्र शासन पुरस्कृत ५०% अनुदान प्राप्त करुन देईल व उर्वरीत ४०% भाग जागेचा सुनियोजित वापर निश्चित करुन त्यातून उपलब्ध करुन देण्यात येईल.

योजना पूर्ण झाल्यानंतर सदरील सदनिकेची मालकी प्रत्यक्ष लाभार्थीकडे सुपूर्त करण्यात येईल.

**पाणी पुरवठा अंदाजपत्रक ''क''**

सोलापूर शहरास खाली प्रमाणे उद्भवातून पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) भिमा नदी | – | ५५ एम.एल.डी. |
| २) उजनी जलाशय | – | ५५ एम.एल.डी. |
| ३) एकरुख तलाव | – | १० एम.एल.डी. |
| एकूण | – | १२० एम.एल.डी. |

पाणीपुरवठ्या वर सध्या दुरुस्ती व देखभाली करिता व घेतलेल्या कर्जाच्या परतफेडी करिता सन २०१५–२०१६ मध्ये रक्कम रु. ६२.१९ कोटी खर्च अपेक्षित आहे. सध्या महानगरपालिकेने १५ एम.एम. घरगुती वापरा करिता वार्षिक आकारणी रु. २७५६/– व बिगर घरगुतीसाठी रक्कम रु. ११,५५६/– इतका दर ठेवलेला आहे. सन २०१५–२०१६ मध्ये रक्कम रु. ६२.१९ कोटी एवढा खर्च लागणार असून, कर्ज परतफेड, वीज बिल, रसायने, सेवक पगार, देखभालीचा खर्च विचारात घेऊन कमीतकमी २० टक्के दरवाढीस मा.सर्वसाधारणा सभेने मान्यता देण्याचे गरजेचे आहे. ही दरवाढ केली तरीही रक्कम रु.१५.६२ कोटी एवढी तूट येणारच आहे.

उजनी जलाशयासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या खर्चावरील मुद्दल व हुडको या वित्तीय संस्थेस अदा करावयाची थकबाकीची अंदाजे रक्कम रु.१८.५९ कोटी निघते. परंतु यापैकी सन २०१५–२०१६ या अंदाजपत्रकात मुद्दल व व्याजाची रक्कम भरण्यासाठी रक्कम रु. ६.०० कोटीची तरतूद करण्यात

आलेली आहे. याचाही विचार महानगरपालिकेने करणे आवश्यक ठरले आहे.

अंदाजपत्रकामध्ये सुचविण्यात आलेली महसुली जमा योग्य प्रकारे वसुली आणणेसाठी सेवकांना कठोर भूमीका घेऊन वसुल आणणे व प्रशासकीय खर्च कमी करणे व उत्पन्नात वाढ करणे याशिवाय पर्याय नाही. अन्यथा भविष्यात आर्थिक अडचणींना सामोरे जाण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही.

एकंदरीत सदरचे अंदाजपत्रक तयार करणेकामी सर्व खाते/ शाखा प्रमुखांचे सहकार्य मिळालेले असून , ते धन्यवादास पात्र आहेत.

**सुकेश गोडगे**

**मुख्यलेखापाल**

**प्रदिप साठे**

**मा.सहा.आयुक्त (म)**

**चंद्रकांत गुडेवार**

**मा. आयुक्त**

**सोलापूर महानगरपालिका**

## ✻ ठळक वैशिष्ट्ये ✻

● महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत सोलापूर शहर मल:नित्सारण व्यवस्था सुधारणे – सदर योजनेची मंजूर किंमत (डी.पी.आर.) शासन मंजूर र.रु.१८७.३६ कोटी. शासकीय अनुदान : ५०% प्रमाणे र.रु. ९३.६८ कोटी म.न.पा. हिस्सा : ५०% प्रमाणे र.रु.९३.६८ कोटी इतका होता. परंतु सुधारित शासन निर्णयानुसार शासकिय अनुदान ७०% व म.न.पा. हिस्सा ३०% असा आहे. यानुसार सुधारित प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही चालु आहे. या योजनेअंतर्गत प्राधान्याने शहर हद्दवाढ पैकी झपाट्याने नागरीकीकरण होत असलेल्या विजापूर रोड व होटगी रोड या भागात नव्याने ड्रेनेजलाईन नियोजित आहेत व त्याच बरोबर सदरहु दोन्ही भागासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत स्वतंत्र मलप्रक्रिया केंद्र (Sewerage Treatment Plant) प्रस्तावीत आहेत. त्याचबरोबर शहर परिसरातील ज्या भागात ड्रेनेजलाईन्स नाहीत त्या भागात नव्याने ड्रेनेज व्यवस्था करणे व मुख्य ट्रन्कसिव्हर नव्याने घालणे तसेच अस्तिवातील देगांव मलप्रक्रिया केंद्राचे जागेत अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत स्वतंत्र मलप्रक्रिया केंद्र (Sewerage Treatment Plant) प्रस्तावीत आहे. सदरचा संपूर्ण योजनेकरिता महाराष्ट्र शासन अंगीकृत व या क्षेत्रातील अनुभवी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे काम करुन घेणार आहे. सदरहु योजना पुर्ण झाल्यानंतर विजापूर रोड व होटगी रोड भागातील सांडपाणी व्यवस्थापन योग्य रितीने होणार असून, शहर परिसरातील ड्रेनेज व्यवस्था पूर्ण क्षमतेने चालणार आहे तसेच भविष्यात अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत स्वतंत्र मलप्रक्रिया केंद्र (Sewerage Treatment Plant) मुळे निर्माण होणारे प्रक्रिया केलेले पाणी व खत याचे ही विक्रीतून म.न.पा.स महसुली उत्पन्न मिळण्याची

शक्यता आहे.

- सोरेगांव जलशुद्धीकरण केंद्र येथे अक्ल्युटर रेस्र्क्युलेशन टँक बांधून धुतलेल्या फिल्टर मधून वाया जाणारे पाण्याचा पुर्नवापर करणे. यामुळे दैनंदिन सुमारे ४ ते ५ एमएलडी पाण्याची बचत होणार आहे. साधारणत्तः दोन महिन्यात हे काम पुर्ण होणे अपेक्षित आहे.
- **महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान योजना (राज्यस्तर) रस्ते विकास प्रकल्प :** महाराष्ट्र शासनाच्या सुवर्णजयंती वर्षानिमित्त राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यातील नगरपालिका/महानगरपालिका यांचे क्षेत्रातील विकास कामांकरिता अनुदान ५०% व सॉफ्टलोन ५०% असा विकास निधी उपलब्ध करणेत आलेला आहे. त्यामुळे संबंधीत नगरपालिका / महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांकरिता राज्य शासनाकडून निधी उपलब्ध झालेला आहे. प्रस्तुत योजनेतून सोलापूर महानगरपालिकेने विकास योजना आराखडा १९९७-२०१७ मधील DP रस्ते (१२ मि, १५ मि, १८ मि वगैरे) रस्ते प्रस्तावीत केलेले आहेत. या योजनेत ६२ कि.मी. लांबीचे एकूण २७ रस्ते विकासित करणेकरिता शासनाकडून पहिल्या टप्प्यात र.रु.१८७.७७ कोटी प्रकल्प किंमतीस मंजुरी मिळालेली आहे. सदर रस्ते हे शहरात प्रवेश करणारे (Entrance road) दोन मुख्य रस्त्यांना जोडणारे रस्ते (Link road) अंतर्गत मोठे रस्ते (Internal road) याचा समावेश आहे. या योजनेतील ६०% रस्ते हे हद्दवाढ भागातील असल्याने हद्दवाढ भागात मोठ्या प्रमाणात विकास होणार आहे. सदर योजनेमध्ये १२ मिटर, १५ मिटर, १८ मिटर रुंदीचे Fullwidth ने रस्ते विकसित होणार असल्यामुळे सोलापूर शहरातील शहर वाहतुक अत्यंत सुरळीत व वेगवान होईल.
- नगरअभियंता विभागअंतर्गत रस्ते विभागाकडील विकास योजना विकसीत

करताना तसेच विकसीत झालेल्या रस्त्यावर खालील प्रमाणे कामाचे नियोजन करुन रस्त्याचे स्वरुप अत्यंत देखणे करणे.

- अस्तित्वातील रस्ताच्या ठिकाणी फुटपाथ मिडीयन इ. दोन रंगामध्ये रंगकाम करणे (पट्टे पद्धतीने)
- अस्तित्वातील रस्त्यावरील रस्तेचे कडेचे इलेक्ट्रीक पोल ४ फुट उंचीपर्यंत दोन रंगात रंग काम करणे. (पट्टे पध्दतीने)
- अस्तित्वातील रस्त्यावर अविकसीत असलेले चौकमधील आयलँड सुशोभिकरण करणे.
- वाहनांच्या पार्किंग सुविधेसाठी रस्त्याचे कडेस सम / विषम तारखेस पार्किंग बाबत बोर्ड लावणे.
- सोलापूर शहरातील १ ते ११ उद्यानामध्ये सुशोभिकरण करणेकरिता र.रु. ६ कोटी इतका खर्च अपेक्षित असुन, त्यापैकी ५०% म्हणजे र.रु. ३ कोटी शासन निधी म्हणुन महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) या योजने अंतर्गत प्राप्त होणार आहेत. तसेच शहरातील विविध बागा विकसित करणे बाबत अंदाजपत्रकामध्ये बजेट तरतुद करण्यात आलेली आहे. शहरातील बागांमध्ये आवश्यकतेनुसार सरंक्षण भिंत, चेनलिंग, फेनसिंग, वाकींग ट्रॅक, जुन्या विहीरींची स्वच्छता करणे, व त्या झाकणे, कारंजे तयार करणे, कर्ब वॉल बांधणे, खेळांचे साहित्य बसविणे, एंट्री गेट बसविणे, जरुरी प्रमाणे इलेक्ट्रिफीकेशन करणे, बाकडे बसविणे इ. कामे करण्यात येणार आहे.
- सन २०१३-१४ मधील महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजने अंतर्गत मा. जिल्हाधिकारी यांनी दि.२/३/२०१४ रोजी शहारातील एकूण ११ स्मशानभूमी विकसित करणेकरिता प्रशासकीय व वित्तीय मंजूरी दिलेली आहे. याकरिता ५०% अनुदान व ५०% मनपा हिस्सा असून, सदर कामांतर्गत प्राधान्यने कंपौड वॉल, बर्निंक शेड, वेटींग

शेड, पाण्याचा हौद, अप्रोच रस्ता, सार्व.शौचालय व्यवस्था, दिवाबत्ती, वेटींग कट्टा इ. कामे करण्यात येणार आहे.

- आरोग्य खात्याच्या अधिपत्याखाली असलेल्या प्रत्येक प्रसुतीगृहाची रंगसफेदी करणे, वैद्यकीय अधिकारी व इतर सेवकांकरिता योग्य प्रकारचे फर्निचर उपलब्ध करुन देणे.
- प्रसुतीसाठी येणाऱ्या महिलांकरिता पिण्याच्या पाण्याची सोय चांगल्या प्रकारचे प्रसाधनगृह व गरम पाण्याची उपलब्धता करणेकामी सोलर सिस्टीम बसविणे तसेच सोलर सिस्टीमद्वारे विद्युत सुविधा करणे.
- प्रसुतीगृहातील जनन वार्ताच्या माहितीची प्रत संबंधीत नागरीकांस देऊन सदर वार्ताची माहिती online पध्दतीने म.न.पा.चे जन्म–मृत्यू विभागास कळविणे त्यामुळे नागरीकांना जन्म दाखले त्वरीत उपलब्ध होतील याकामाकरिता प्रसुतीगृहाकडील सर्व सेवकांना संगणक प्रशिक्षण देणे जरुरीचे आहे.
- कर आकारणी व हद्दवाढ विभागातील थकबाकी वसुलीसाठी विशेष मोहिमेअंतर्गत वसुल करुन म.न.पा. चे उत्पन्न वाढीचे प्रयत्न करणेत येणार आहे.
- अक्कलकोट रोड एम.आय.डी.सी. भागातील मिळकतदारांकडून जे उत्पन्न येईल त्यातील ७०% इतकी रक्कम त्याच भागात विविध विकासाची कामे करणेत येईल.
- भांडवली मुल्यावर्धीत कर प्रणाली रबविणेत येणार असून, त्यानुसार सर्व मिळकतकरांचे (GIS) प्रणालीद्वारे सर्वेक्षण करुन टॅक्सची आकारणी करण्यात येणार आहे. त्यामुळे मनपाच्या उत्पन्नवाढीव मध्ये वाढ होणार आहे.
- सध्या भाडेकरावरती सुपरटॅक्सची आकारणी करणेत येत आहे. परंतु १

एप्रिल २०१५ पासून सुपरटॅक्स ऐवजी भाडेकराराप्रमाणे मूळ भाडेवरती आकारणी करणेत येणार आहे.

- मा. शासनाच्या धोरणानुसार तसेच सुसपष्टता व पारदर्शकता आणणेसाठी दुहेरी नोंद लेखापद्धतीने कामकाज ठेवण्याचे दृष्टीकोनातून संगणक प्रणाली कार्यान्वित करणेत येत आहे.
- Ecohousing मध्ये १ स्टार ते ५ स्टार पर्यंत रेटींग करणेत येणार आहे. अशा इमारतींना १० ते ५० टक्केपर्यंत मालमत्ता करामध्ये सुट देण्याचे प्रस्तावीत आहे.
- सेवा क्षेत्रातील ज्या उद्योगांसाठी नवीन इमारतीचे बांधकाम करण्यात येईल त्यांना पूर्णत्त्वाचा दाखला मिळालेल्या वर्षापासून पुढील ५ वर्षांसाठी मालमत्ता करामध्ये १०० टक्के सुट देण्यात येईल.
- एन.टी.पी.सी. : एन.टी.पी.सी. मार्फत सोलापूर शहर व इतर तीन प्रकल्पग्रस्त गांवाकरिता (होटगी स्टेशन, फताटेवाडी व आहेरवाडी) पाणीपुरवठा योजना करण्याकरिता र. रु. २५० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आलेला आहे. सदर योजनेकरिता टाकणेत येणारी पाईपलाईन सध्या चालु असलेल्या एन.टी.पी.सी.च्या पाईपलाईनच्या समांतर टाकण्याचा प्रस्तावीत आहे. या योजनेतून एकूण ७५.०० द.ल.लि. प्रतिदिन इतके पाणी येणार होते. या योजनेअंतर्गत टाकण्यात येणारी पाईपलाईन करिता पाईपचा पुरवठा करणे, पाईपलाईन अंथरणे, हेडवर्क्सची कामे करणे, पंपींग मशिनरीचा पुरवठा करणे व बसविणे इ. कामे एन.टी.पी.सी. मार्फत राबविणेत येणार होते. उर्वरीत कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रकल्प व्यवस्थापन विभागातर्फे पूर्ण ठेव तत्वार (Full Deposite Work) करण्यात येणार होते. मात्र सध्या एन.टी.पी.सी. चे अधिकारी सो.म.न.पा. साठी जी कामे करणार होती ती

कामे करण्यास असमर्थता दर्शविलेली आहे व पाणीपुरवठासाठी मंजूर केलेली रक्कम २५.०० कोटी सो.म.न.पा. कडे वर्ग करण्यास तयारी दर्शविलेली आहे.

- शहराची भविष्यातील सन २०१५ ची लोकसंख्या गृहीत धरुन वाढीव पुरवठा व पाणी पुरवठ्यात सुधारणा करणेकामी तज्ञ कन्सलटंटकडून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केलेला आहे. सदर प्रकल्पाची किंमत र.रु. १२४०.५६ कोटी इतकी असून त्यामध्ये उजनी धरणापासून २६८.०० द.ल.लि. पाणी आणणे करिता समांतर जलवाहिनी टाकणे, पाकणी व सोरेगाव येथे अनुक्रमे ६० व १०० द.ल.लि. क्षमते चे जल शुध्दीकरण केंद्र बांधणे, एकरुख योजना व भीमा योजनेअंतर्गत आवश्यक दुरुस्त्या करणे, नव्याने ६ एम.बी.आर. बांधणे वगैरे कामाचा समाविष्ठ आहे. सदर प्रकल्प अहवाल शासनाकडे मंजुरीस्तव व निधी प्राप्त होणेस्तव सादर करणेत आलेला आहे.
- शहराची भविष्यातील ३० वर्षाची लोकसंख्या गृहीत धरुन व सध्या शहराच्या ज्या भागात ड्रेनेज लाईन नाही अशा सर्व भागाचा सर्वे करुन हद्दवाढ व शहरातील नव्याने ड्रेनेज लाईन टाकणेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन घेण्यात आलेला आहे. या प्रकल्पाची किंमत र.रु. ६१४.०० कोटी इतकी आहे. मा. म.न.पा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनंतर शासनाकडे मंजूरीस्तव सादर करणेचा आहे. यामध्ये दोन ठिकाणी मलनित्सारण केंद्र व पंपींग स्टेशन बांधणे कामाचा समाविष्ठ आहे.
- धर्मवीर संभाजी तलाव (कंबर तलाव) संवर्धन व सुशोभिकरण करणेच्या दृष्टीने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आलेला आहे. सदर प्रकल्प अहवाल केंद्र शासनाच्या राष्ट्रिय सरोवर संवर्धन कार्यक्रम अंतर्गत मंजुरीस्तव व निधी मिळणेस्तव व सादर करणेत आलेला आहे. या प्रकल्प अहवालीची किंमत र.रु. ७.५३ कोटी इतका आहे. या मध्ये केंद्र

शासनाकडून ७०% व म.न.पा. हिस्सा ३०% इतका आहे. या प्रकल्प अहवालास राज्या शासनाने शिफारस करुन सध्या केंद्रशासनाकडे पाठविणेत आलेला आहे. प्रकल्प अहवालामध्ये मुख्यतः तलावात येणारे सांडपाणी वळविणे, तलावातील भौतालच्या भागातील गाळ काढणे तवालाभोवती चेनलिंग फेन्सींग करणे, जनपर्नी काढणे, टॉयलेट ब्लॉक बांधणे, तलावात जेट फाऊंटन बसविणे वगैरे कामाचा समावेश आहे.

- टाकळी सोरेगांव दरम्यान असलेल्या नांदणी येथे नव्याने ब्रेक प्रेशर टँक (बी.पी.टी.) बांधणेचे काम चालु असुन सदर काम मार्च महिना अखेर पुर्ण होणार आहे. सदर (बी.पी.टी.) कार्यान्वित झाल्यावर टाकळी पंप हाऊस येथे चौथा पंप चालवून ज्यादा पाणी उपसा करता येईल.